# योग शिक्षक मुलाखत व प्रात्यक्षिकबाबतच्या सुचना

## जिल्हा परिषद सातारा दि. ०५/०२/२०२४

१) जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या अंतिम गुणवत्ता यादितील उमेदवारांनीच फक्त मुलाखत व प्रात्यक्षिकाकरीता उपस्थित रहावयाचे आहे.

२) अंतिम यादीमधील सर्वांनी आपला मेरिट क्रमांक हजेरीपत्रकावर नोंदविणे अनिवार्य आहे.

३) उमेदवारांनी येताना सैल कपडयांमध्ये व स्वत:ची योगा मॅट घेवुन यावयाचे आहे.

४) मुलाखत व प्रात्यक्षिक करीताचे ठिकाण - **योग प्रशिक्षण सभागृह, आयुष विभाग, जिल्हा रुग्णालय सातारा.**

५) मुलाखत व प्रात्यक्षिक करीताचे दिनांक - **सोमवार दि. ०५/०२/२०२४**

६) मुलाखत व प्रात्यक्षिक वेळ - **दुपारी ०२.३० वाजलेपासुन**.

७) उमेदवारांना मेरिट क्रमांकानुसार मुलाखत व प्रत्यक्षिकाकरीता बोलविणेत येईल. तरी सर्वांनी वेळेत उपस्थित रहावे. दुपारी ०३.३० नंतर आल्यास संबंधित उमेदवारास प्रवेश दिला जाणार नाही व भरती प्रक्रियेतुन वगळणेत येईल.

८) उमेदवारांना देणेत आलेल्या नियुक्ती आदेशामध्ये कोणत्याही प्रकारचे बदल केले जाणार नाहीत. त्यामुळे समुपदेशनाने नियुक्ती दिल्यानंतर नियुक्ती ठिकाण बदलणेसाठी या कार्यालयास पत्र व्यवहार/विनंतीअर्ज /पदाधिकारी यांचेमार्फत शिफारस करु नये.

९) या प्रक्रियेसंदर्भात तक्रार उदभवल्यास त्याचे निराकरण करण्याचे पुर्ण अधिकार मा. जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. सातारा यांना आहेत.

१०) **उमेदवारांनी कोणत्याही पध्दतीने पदस्थापनेसाठी व भरती प्रक्रियेसंदर्भात या कार्यालयावर दबाव आणु नये अन्यथा योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

११) जे उमेदवार पसंतिनुसार नियुक्ती ठिकाण न मिळाल्यास योग शिक्षक या पदावर काम करणेस इच्छुक नसतील त्यांचा नकार गृहीत धरुन तात्काळ नकारपत्र भरुन घेणेत येईल. त्यामुळे उमेदवारांनी विचारांती निर्णय घ्यावा.

१२) उमेदवारांना समुपदेशनापश्चात कंत्राटी नियुकती आदेश जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील.

१३) नियुक्ती आदेशापश्चात ३ दिवसाच्या आत दिलेल्या नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणेचे आहे व तसा हजर अहवाल तालुका कार्यालयामार्फत जिल्हा कार्यालयास ई मेलव्दारे पाठविणेचा आहे.

१४) आपण नियुक्ती आदेशानुसार दिलेल्या ठिकाणी विहित मुदतीत हजर न झाल्यास आपण सदर पदावर काम करण्यास इच्छुक नसून आपली जिल्हा कार्यालयाकडे या बाबतची कोणतीही भविष्यात तक्रार असणार नाही व नियमाप्रमाणे प्रतिक्षायादी मधील असणाऱ्या उमेदवारांना पुढील नियुक्ती आदेश दिले जातील.

१५) उमेदवारांनी प्रात्यक्षिकासाठी स्वत:ची योगा मॅट आणणे बंधनकारक आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सातारा